# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक १४/०५/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---


## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

आज दि. १४/०५/२०२२ रोजी पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उमरेड उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गोपनीय बातमीदारा कडून बातमी मिळाली की, पोलीस ठाणे उमरेड हद्दीत भिवापुर मार्गे उमरेड नागपूर च्या दिशेने एक ४ चाकी पांढरे रंगाची महिंद्रा पिकअप गाडी क्रमांक एमएच—३१/ईएन—१३३७ चा चालक त्याचे मालकाचे सांगण्यावरून कत्तली करिता गौवंश जनावरे ची अवैध वाहतुक करणार आहे. अश्या मिळालेल्या माहिती वरून पोलीस ठाणे उमरेड हद्दीत गांगापूर फाटा येथे स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने नाकाबंदी केली असता महिंद्रा पिकअप गाडी क्रमांक एमएच—३१/ईएन—१३३७ येतांना दिसली. त्यावरून वाहन थांबवून पाहणी केली असता वाहनात आरोपी नामे— अभिषेक राजेश वाघमारे(चालक), वय २४ वर्ष, रा. वॉर्ड क्र २ भिवापूर व २) नाजीम अहमद कुरेशी(गाडी मालक), रा. गड्डीगोदाम नागपूर यांच्या ताब्यातुन १ बैल १० गायी असे एकुण ११ गौवंश जनावरे कि. ८०,०००/—रू. निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती ५,८०,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस हवालदार मदन आसतकर स्थानिक गुन्हे शाखा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११(१)(घ)(ड)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, सहकलम ५(अ),९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम सहकलम १८४,१३०/१७७ मोवाका सहकलम १०९ भादवी काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र. १ ला अटक करण्यात आली आहे. आरोपी व मुद्देमाल पोस्टे उमरेड यांचे ताब्यात पूढील कायदेशिर कार्यवाही करिता देण्यात आलेला आहे. पोस्टे उमरेड पुढील तपास करित आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. वियजकुमार मगर नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर ना. ग्रा. यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात सपोनि जितेंद्र वैरागडे, पोहवा मदन आसतकर, पोहवा नरेंद्र पटले, पोना मयूर ढेकले, पोना अमृत किंनगे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर